**इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी**
**मालमत्ता व्यवस्थापन विभाग**
**जाहिर प्रकटन**

इचलकरंजी महानगरपालिका मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडील **इमपा मालकीच्या सर्व स्थावर मालमत्तांचे सर्वेक्षण करुन त्या संबंधीत सर्व रेकॉर्ड संगणीकृत करणे. अंदाजपत्रक रक्कम रु. ८,२५,०००/-** ( GST वगळून) कामाची परसेंटेज दराची दुहेरी लिफाफा पध्दतीने खालील नमुद अटी/ शर्तीच्या अधिन राहून नोंदणीकृत व्यक्ती/ संस्थांकडून कोटेशन मागविणेत येत आहे.

**वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.**

अ) लिफाफा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) बयाणा रक्कम रक्कम रु. ९,९००/- हा इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत /शेडयूल्ड/ सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या शाखेतील कामाची मुदत अधिक ६ महिने इतक्या कालावधीचा धनाकर्ष (डी.डी.) मा.आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचे नावाने काढणेचा आहे.
२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
३) संबंधीत कामानुसार अनुभवाची कागदपत्रे
४) पुरवठाधारकाचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.
५) पुरवठाधारकाचा G.S.T. अकौंट क्रमांक असणे आवश्यक.
६) निविदा कराच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असलेस त्या बाबत कुल मुखत्यारपत्र.
७) आर्थिक सक्षमता - बँक सॉलवन्सी/ IT रिटर्न ( तीन वर्षे)
८) मक्तेदार कोणत्याही शासकिय/निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र
९) Form IB ( रु. १००/- च्या स्टँपपेपवर)

**ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे अपलोड करणेत यावे.**

१) कोटेशनाचे परसेंटेज दर हेअक्षरी व अंकी पुरवठाधारकाने साक्षांकीत केलेले.
२) अंदाजपत्रक पेक्षा कमी दर असल्यास नियमाप्रमाणे बॅक हमीपत्र देणे बंधनकार राहील.

23.2.24

**(सोमनाथ आढाव)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

**अटी / शर्ती-**

१. सदर जाहिर प्रकटन http://ichalkaranjimnp.in या इचलकरंजी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.२३/२ /२०२४ रोजी स.११.०० वाजले पासून दि.२९/२ /२०२४ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.

२. इचलकरंजी महानगरपालिका बारनिशी विभागाकडे सिलबंद कोटेशन दर सादर करण्याची अंतिम दिनांक.~~०१/३~~ /२०२४ ~~सायं. ६.२५~~ वाजेपर्यंत राहील.
२९.०२.२०२४ ~~दु.४.००~~ सायंकाळी ६ वाजेपर्यंत

३. शक्य झालेस प्राप्त कोटेशन दर दि. 09/ 3 /२०२४ दुपारी ३.०० वाजता उपस्थित पुरवठाधारक यांचे समोर उघडणेत येईल.

४. कोणतेही कोटेशन दर मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

५. दरपत्रक / कोटेशन स्विकृत केल्याचे पात्र संस्थेस इकडून लेखी कळविणेत येईल. त्यानुसार जास्तीत जास्त सात (७ ) दिवसात योग्य त्या स्टँपवर विहीत नमुन्यात लेखी करारनामा स्वखर्चाने करुन देणेचा आहे. व आवश्यक त्या बयाणा व सुरक्षा रक्कमेचा भरणा करणे संस्थेस बंधनकारक राहील.

६. अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का तसेच पानांकन असणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांवर सही व शिक्का नसल्यास अर्जदाराचा विचार करता येणार नाही.

७. ज्यांचे कोटेशन मंजुर होईल त्यांचे बिलातुन ९% इतकी रक्कम डिपॉझीटपोटी वजा करुन घेतली जाईल व काम पूर्ण झालेनंतर ६ महिन्यांनी परत केली जाईल.

८. उक्त कामी मागविणेत आलेले दरपत्रक / कोटेशन अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तसाो / उपायुक्तसाो यांना राहील.

९. वरील अटी / शर्तीमध्ये आवश्यक ती वाढ करणे / सुधारणा करणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्तसाो व मा. उपायुक्तसाो यांना राहतील.

१०. संबंधित पुरवठाधारक यांनी प्राप्त होणा-या रक्कमेवर आयकर विभाग व इतर विभागाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेला कर संस्थेने संबंधित विभागास भरणे / कपात करुन घेणे बंधनकारक असेल.

११. सदर कामी सर्व शासकीय कर, GST, विमा प्राव्हीडंट फंड वगैरे भरणेचे जबाबदारी संस्थेची राहील.

१२. याकामी महानगरपालिकाकडे उपलब्ध असलेल्या निधीप्रमाणे देयक आदा केले जाईल.विलंबाबाबत कोणतेही व्याज तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व संबधित तरतुदी लागु राहतील.

१४. कोटेशन सादर करणा-या संस्थेचे नोंदणीकृत ऑफिस महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे.

१५. कोटेशन सादर करणा-या संस्था नोंदणीकृत MSME युनिट असणे आवश्यक आहे.

१६. कोटेशन सादर करणा-या संस्थेचे लॅड ऑडिट संबंधीत किमान एक काम महाराष्ट्रातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था / शासकीय विभागाकरिता केले असणे आवश्यक आहे.

१७. कोटेशन सादर करणा-या संस्थेचे वैध IT / ITES ( Information technology enabled services) नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१८. कोटेशन सादर करणा-या संस्थेस GIS प्रोजेक्टस् मध्ये काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**(सोमनाथ आढाव)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका